ठाणे, गुरुवार दि. २९ ऑगस्ट २०२४ वर्ष : १३, अंक : १२२ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

**सरकारचा वाटा वाढवल्याने निवृत्तांस आर्थिक स्थैर्य...**

गेल्या दहा वर्षांत सरकारी कामगार संघटनांच्या नेत्यांस भेटण्यासाठी पंतप्रधानांस वेळ मिळाला नव्हता. ताज्या निवडणुकीत मतदारांचा दणका बसल्यावर तो मिळाला आणि पाठोपाठ सरकारी कर्मचाऱ्यांच्या रोषाच्या ......पान २ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com


**तापमान**

कमाल ३६° से | किमान २९° से

**बाजार**

सोने ७३,२८० | चांदी ९३,६८०

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



मला सांगा, माझ्या बँक अकाउंटवर सरकारने काही रक्कम टाकली आहे, ही माहिती त्या शेजारच्या सटवीनेच तुम्हाला दिली ना?

ठाण्यात महाविकास आघाडीचे निदर्शने

**अनुभवहीन आपटेला कॉंट्रॅक्ट कुणी दिले –डॉ.जितेंद्र आव्हाड**

(सविस्तर वृत्त पान ४ वर )

**थोडक्यात घडामोडी**

### महाराष्ट्रात केंद्राप्रमाणेच एकीकृत निवृत्ती वेतन योजना लागू

केंद्र सरकारने २४ ऑगस्ट रोजी ''एकीकृत निवृत्तिवेतन योजना'' घोषित केली. त्याच धर्तीवर प्रस्तावित ''सुधारीत राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना'' ऐवजी महाराष्ट्र राज्यामध्ये ही योजना जशीच्या तशी लागू करण्यात येत आहे. तसेच या अनुषंगाने येणाऱ्या अतिरिक्त खर्चास मान्यता देण्यात येत आहे असे वित्त विभागाने कळविले आहे. केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांना लागू केलेल्या एकीकृत निवृत्तिवेतन योजनेची मार्गदर्शक तत्वे केंद्र सरकारचे अनुषंगाने महाराष्ट्रात लागू करण्याकरिता वित्त विभागास प्राधिकृत करण्यात येत आहे.

## राजकोट किल्ल्यावर शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे कार्यकर्ते आणि राणे समर्थकांमध्ये राडा

# भाजपचे भ्रष्टाचारी सरकार महाराजांना देखील सोडत नाही

**आदित्य ठाकरे यांचा घणाघात**

**मुंबई – शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते, युवासेना प्रमुख, आमदार आदित्य ठाकरे हे महाविकास आघाडीच्या नेत्यांसोबत राजकोट किल्ल्यावर पाहणी करायला गेले होते. त्यावेळी नारायण राणे व त्यांच्या चिल्ल्यापिल्ल्यांनी राजकोट किल्ल्यावर येत गोंधळ घातला. त्यांच्या त्या गोंधळाला शिवसैनिकांनी देखील जोरदार प्रत्युत्तर दिले. आदित्य ठाकरे यांनी यावेळी पत्रकारांशी बोलताना भाजपच्या भ्रष्ट कारभारावर जोरदार टीकास्त्र सोडलं. यावेळी आदित्य ठाकरे यांनी महाराष्ट्रात काही घडलं तर त्याला देवेंद्र फडणवीस जबाबदार असतील असा इशारा देखील दिला.**

इथे बोलण्यासारखे शब्दच नाही. पुतळ्यामध्ये भाजपवाले चोरी भ्रष्टाचार करू शकतात हे आमच्या आकलनाबाहेर आहे. तरी देखील त्यांनी ते करून दाखवले आहे. हे व्हायलाच नको होते. जगभरात असे अनेक पुतळे आहेत जे समुद्राच्या किनाऱ्यावर आहे. स्टॅच्यू ऑफ लिबर्टी आहे, छत्रपती शिवाजी महाराजांचा गेट वे ऑफ इंडियाला पुतळा आहे. हा जो जदीप आपटे आहे




तो कुठे आहे? २४ वर्षाच्या मुलाला कुणी कॉन्ट्रॅक्ट दिलं? त्याला पळून जायला मदत कुणी केली? या प्रश्नांची उत्तर यांनी द्यावी, असे आदित्य ठाकरे म्हणाले.

### आदित्य ठाकरेंनी राजकोट किल्ल्याला भेट देताना निलेश राणेंचा थयथयाट

राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा काही दिवसांपूर्वी कोसळला. यानंतर अवघ्या राज्यभरात संताप व्यक्त होत आहे. विरोधी पक्षांनीही सत्ताधारी मिंधे सरकारच्या कामावर प्रश्न उपस्थित करून त्यांना लक्ष्य केले आहे. दरम्यान, या ठिकाणची पाहणी करण्यासाठी आणि राजकोट किल्ल्यावर महाराजांसमोर नतमस्तक होण्यासाठी आज शिवसेना नेते, युवासेनाप्रमुख आमदार आदित्य ठाकरे आणि महाविकास आघाडीचे नेते राजकोट किल्ल्यावर गेले होते. यामध्ये जयंत पाटील, अंबादस दानवे, आमदार वैभव नाईक यांचा समावेश होता.

मात्र आदित्य ठाकरे आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांना किल्ल्यावर जाऊ द्यायचे नाही म्हणून सिंधुदुर्गचे खासदार नारायण राणे आणि त्यांचा मुलगा भाजप नेते निलेश राणे तिथेच उपस्थित होते. आदित्य ठाकरे आणि मविआचे नेते किल्ल्याच्या परिसरात पोहोचले तेव्हा भाजप आणि राणे समर्थकांनी घोषणाबाजी केली आणि त्यांना रोखण्यासाठी पोलिसांवर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. निलेश राणे यांनी तर अक्षरश: थयथयाट सुरू केला. ते पोलिसांच्या अंगावर देखील धावून गेले. मात्र पोलिसांनी संयमीपणे त्यांना ऐकून घेण्याची विनंती केली. याचे व्हिडीओ व्हायरल झाले आहेत.

### हवा काय फक्त सिंधुदुर्गात येते का?

शरद पवार यांनी भाजप आणि राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. मोदी साहेबांच्या अचानक मनात आलं आणि त्यांनी नवीन पार्लमेंट तयार केली. त्यांनी विरोधी पक्षातील सदस्यांना पार्लमेंटच्या उद्घाटनासाठी बोलावलं नाही. ज्यांचा पार्लमेंटची काहीही संबंध नाही, त्यांच्या हातातून पार्लमेंटचं उद्घाटन करण्यात आलं. पंतप्रधानांनी संसदेचा उद्धाटन केलं, मात्र त्या ठिकाणी काही ना काही कमतरता आढळली. अयोध्येत राम मंदिर बनवलं. मंदिरात पाणी यायला सुरुवात झाली आहे. आता महाराष्ट्रात देखील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बांधण्यात आला. शिवाजी महाराज सर्वांना सोबत घेऊन जाणारे राजे होते. शिवाजी महाराजांनी अल्पसंख्यांकाला देखील आपला हिस्सा दिला होता. त्यांच्या पुतळ्याच्या संदर्भामध्ये नुकतीचे घटना घडली. पंतप्रधान मोदी देखील त्या कार्यक्रमाला आले होते. आठ महिन्यांपूर्वी पुतळ्याचे उद्धाटन झाले आणि आता तो पुतळा कोसळला. आठ महिन्यात घडले आहे, असे शरद पवार म्हणाले.



**तसं काही घडलं नाही**

ज्यांच्या हातात सत्ता आहे. मुख्यमंत्री असो किंवा त्यांचे सहकारी असोत त्यांचं म्हणणं आहे की, त्या ठिकाणी इतकी जोरात हवा होती की तो पुतळा कोसळला. आता गेटवे ऑफ इंडियाच्या इथे शिवाजी महाराजांचा पुतळा आहे. ५० वर्षांपेक्षा जास्त जुना हा पुतळा आहे. मात्र हा पुतळा जसाच्या तसा आहे. मला हे कळत नाही की हवा फक्त काय फक्त सिंधुदुर्गमध्ये येते का? गेटवे ऑफ इंडिया या ठिकाणी असं काही कधी झालं नाही, असा जाबच शरद पवार यांनी विचारला.



- **घरात खेचून एकेकाला रात्रभर मारून टाकेन– राणे**
- **खालच्या प्रकारचं राजकारण करू नका– ना. फडणवीस**

## रायलादेवी तलाव येथे गणेश मूर्ती विसर्जन आणि छट पूजा यांच्यासाठी केली जाणार पुरेशी व्यवस्था



- **महापालिका आयुक्त सौरभ राव आणि एमएमआरडीएचे अतिरिक्त महानगर आयुक्त अश्विन मुदगल यांची रायलादेवी तलाव सुशोभीकरण कामाची पाहणी**

ठाणे (२८) : रायलादेवी तलाव येथे गणेश मूर्ती विसर्जन आणि छट पूजा यांच्यासाठी लागणारी पुरेशी व्यवस्था केली जाणार आहे. या तलावाच्या सुशोभिकरणाचे काम एमएमआरडीएमार्फत केले जात आहे. या कामाची पाहणी बुधवारी महापालिका आयुक्त सौरभ राव आणि एमएमआरडीएचे अतिरिक्त महानगर आयुक्त अश्विन मुदगल यांनी केली. त्यावेळी, माजी ज्येष्ठ नगरसेवक राम रेपाळे आणि एकनाथ भोईर तसेच नागरिक उपस्थित होते. तलावाच्या सुशोभिकरणाचे काम वेगाने सुरू आहे. **(पान २ वर)**



## आनंद दिघे यांच्या पुण्यतिथीनिमित्त महाआरोग्य शिबिराचे आयोजन

ठाणे दि : गुरुवर्य धर्मवीर आनंद दिघे यांच्या पुण्यतिथी दिनानिमित्त शिवसेना उद्धव बाळासाहेब पक्षाच्या वतीने महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

गुरुवर्य धर्मवीर आनंद दिघे यांच्या पुण्यतिथी दिनानिमित्त शिवसेना जिल्हा प्रमुख केदार दिघे यांच्या संकल्पनेतून व शिव आरोग्य सेनेचे ठाणे जिल्हा समन्वयक एकनाथ अहिरे यांच्या वतीने या महाआरोग्य शिबिराचे आयोज करण्यात आले होते. या शिबिराला शिवसेना नेते मा.खासदार राजन विचारे,शिव आरोग्य सेना कार्याध्यक्ष डॉ. किशोर ठाणेकर ,महाराष्ट्र राज्य समन्वयक जितेंद्र दगडु सकपाळ,शिवसेना जिल्हा प्रमुख केदार दिघे,माजी उपमहापौर (ठा.म.पा.) नरेशजी मणेरा,शिव आरोग्य सेना नवी मुंबई समन्वयक श्री.प्रताप गाथे,शिवसेना ठाणे शहर सह सचिव विश्वास निकम,शिवसेना ठाणे शहर सह समन्वयक राम काळे,महिला आघाडी ठाणे जिल्हा संघटक रेखा खोपकर महिला आघाडी उप जिल्हा संघटक आकांशा राणे,शिवसेना शहर प्रमुख प्रदिप शिंदे,शिव आरोग्य सेनेचे ठाणे जिल्हा संपर्क समन्वयक डॉ. प्रशांत भुईंबर,डॉक्टर सेलचे उपाध्यक्ष डॉ.राकेश यादव, चंदनवाडी शिवसेना शाखाप्रमुख तानाजी कदम, कार्यालय प्रमुख संदिप राणे आणि निलेश पाष्टे,आदींसह मान्यवर उपस्थित होते. शिवसेना शाखा चंदनवाडी **(पान २ वर)**

## मुंबईत २३८ गोविंदा जखमी, दोघांची प्रकृती गंभीर

मुंबईसह महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात दहीहंडी उत्सव पार पडला. मुंबई, ठाणे परिसरात लाखो रुपयांचे पारितोषिक असलेल्या उंचच उंच दहीहंडी फोडण्यासाठी पथकांमध्ये चुरस रंगल्याचे पाहायला मिळाले. मुंबईत मोठ्या जल्लोषात दहीहंडी उत्सव पार पडत असताना दुसरीकडे थरावरुन कोसळल्याने काही गोविंदा जखमी झाले आहेत. त्यामुळे दहीहंडी उत्सवाला गालबोट लागले आहे. मुंबईसह ठाण्यात आतापर्यंत २३८ गोविंदा जखमी झाले आहेत. या गोविंदांवर सरकारी व खासगी रुग्णालयांमध्ये उपचार सुरु आहेत.

मुंबई महापालिकेने दिलेल्या माहितीनुसार, मुंबईत मोठ्या उत्साहात पार पडलेल्या दहीहंडी उत्सवात आतापर्यंत २३८ गोविंदा जखमी झाले आहेत. यातील २ जणांवर ओपीडीमध्ये उपचार सुरु आहेत. तर २०४ गोविंदांना डिस्चार्ज देण्यात आला आहे. तर ठाण्यात १९ जण जखमी झाले आहेत. त्यांच्यावरही रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

## ठाण्यात जखमी गोविंदाची संख्या २२ वर -बहुतांश गोविंदा किरकोळ जखमी



मंगळवारी ठाण्यात गोविंदा पथकाचा जल्लोष आणि एकच गर्दी होती. संपूर्ण ठाण्यातील लाखोंच्या हंडीत गोविंदा पथकाने नऊ थरांचा थरार केला. मात्र १० थरांचा थरार मात्र कुठल्याच गोविंदा पथकाला जमलं नाही. मंगळवारी संध्याकाळ पर्यंत ठाण्यात दहीहंडीत पडून जखमींची संख्या आठवर होती. जखमी गोविंदाची संख्या हि आता २२ वर गेली तर २१ जण कळव्याच्या छत्रपती शिवाजी रुग्णालयात उपचार घेतला तर एक ठाण्यातील गोविंदावर ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत.


बुधवारी दुपार पर्यंत ठाण्याच्या जिल्हा शासकीय रुग्णालय आणि कालवा छत्रपती शिवाजी रुग्णालयात उपचार **(पान २ वर)**

**मोदी सरकारचा मोठा निर्णय !**

# १२ औद्योगिक स्मार्ट शहरे बनवणार, १० लाख लोकांना मिळणार रोजगार

**नवी दिल्ली– पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत नॅशनल इंडस्ट्रियल कॉरिडॉर डेव्हलपमेंट प्रोग्राम (छखउउझ) अंतर्गत १२ औद्योगिक स्मार्ट शहरे तयार करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. यूपीच्या आग्रा आणि प्रयागराज व्यतिरिक्त बिहारच्या गया जिल्ह्याचा या प्रकल्पात समावेश करण्यात आला आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाद्वारे सरकार २८,६०२ कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. या प्रकल्पामुळे १० लाख लोकांना थेट रोजगार मिळेल, असे सरकारकडून सांगण्यात आले.**

केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळाच्या निर्णयाबाबत माहिती दिली की, देशांतर्गत उत्पादनाला चालना देण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाने ९ राज्यांमध्ये १२ नवीन औद्योगिक स्मार्ट शहरांच्या निर्मितीला मंजुरी दिली आहे. यामध्ये २८,६०२ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. प्रस्तावित १२ औद्योगिक स्मार्ट शहरांमधून १.५२ लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीच्या संधी निर्माण होतील.



### कोणत्या शहरांना फायदा होईल?

- सरकारचा हा निर्णय, ९ राज्यांमध्ये पसरलेला आणि ६ प्रमुख कॉरिडॉरसह नियोजित असलेला हा प्रकल्प, देशाच्या उत्पादन क्षमता आणि आर्थिक विकासाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.
- नॅशनल इंडस्ट्रियल कॉरिडॉर डेव्हलपमेंट प्रोग्राम अंतर्गत, या क्षेत्रांमध्ये अनेक महत्त्वाच्या रोजगाराच्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा आहे, ज्यामध्ये नियोजित औद्योगिकीकरणाद्वारे सुमारे १० लाख लोकांसाठी प्रत्यक्ष नोकऱ्या आणि ३० लाख लोकांसाठी अप्रत्यक्ष नोकऱ्या निर्माण होतील.
- आज, बुधवारी पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीला पंतप्रधान मोदीशिवाय गृहमंत्री अमित शहा आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह हेही उपस्थित होते. कॅबिनेट बैठकीनंतर पंतप्रधान मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांच्यातही स्वतंत्र बैठक झाली.

### महाराष्ट्रातील दिघी पोर्टला केंद्रीय मंत्रीमंडळाची मंजुरी

महाराष्ट्राला काय मिळणार?– महाराष्ट्रातील दिघी पोर्टला केंद्रीय मंत्रीमंडळाने मंजुरी दिली आहे. ६ हजार ५६ एकर परिसरात पोर्ट उभे राहणार आहे. या प्रकल्पाला ५ हजार ४६९ कोटी रूपये खर्च येणार आहे. यामुळे १ लाख १४ हजार १८३ रोजगार निर्माण होणार आहेत. अशी माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांची पत्रकार परिषदेत दिली.

### स्मार्ट औद्योगिक शहरे कोठे बांधली जातील?

देशातील १० राज्यांमध्ये १२ स्मार्ट औद्योगिक शहरे बांधली जाणार आहेत. याशिवाय ६ मुख्य कॉरिडॉर उभारण्यात येणार आहेत. या शहरांमध्ये स्मार्ट औद्योगिक शहरे बांधली जातील–

- खुरपिया उत्तराखंडमध्ये आहे
- पंजाबमध्ये स्थित राजपुरा पटियाला
- महाराष्ट्रातील दिघी
- केरळमधील पलक्कड
- उत्तर प्रदेशातील आग्रा आणि प्रयागराज
- बिहारला गया
- तेलंगणातील झहीराबाद
- आंध्र प्रदेशातील ओरवक्कल आणि कोपारत्थी
- राजस्थानमधील जोधपूर पाली

ही सर्व शहरे पीएम गतिशक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅनच्या निर्देशानुसार तयार केली जातील. या शहरांमध्ये मल्टी मॉडेल कनेक्टिव्हिटी इन्फ्रास्ट्रक्चरची स्थापना केली जाईल.

प्लग अँड प्ले आणि वॉक टू वर्क ही संकल्पना डोळ्यासमोर ठेवून ही स्मार्ट सिटी उभारण्यात येणार आहे.

# संपादकीय...



संपादक-चंद्रकांत भोईटे

## सरकारचा वाटा वाढवल्याने निवृत्तांस आर्थिक स्थैर्य

गेल्या दहा वर्षांत सरकारी कामगार संघटनांच्या नेत्यांस भेटण्यासाठी पंतप्रधानांस वेळ मिळाला नव्हता. ताज्या निवडणुकीत मतदारांचा दणका बसल्यावर तो मिळाला आणि पाठोपाठ सरकारी कर्मचाऱ्यांच्या रोषाच्या केंद्रस्थानी असलेली नवी निवृत्तिवेतन योजनाही रद्द झाली. हा योगायोग खचितच नाही. ही केंद्राची गेल्या चार महिन्यांतील पाचवी माघार. वक्फ बोर्ड सुधारणा, वैद्याकीय विम्यावरील वस्तू-सेवा कर, प्रसारण विधेयक, सरकारी पदांवर खासगी व्यक्तींच्या नेमणुकीसारखा महत्त्वाचा निर्णय आणि आता हे निवृत्तिवेतन घूमजाव. केंद्र सरकारच्या प्रवक्त्यांनी या संदर्भात कितीही 'हे घूमजाव नाही' असा कंठशोष केला तरी वास्तव लपून राहणारे नाही. यात कृषी सुधारणा, जमीन हस्तांतरण कायदा इत्यादी आधीच्या घूमजाव निर्णयांचा समावेश केल्यास या सरकारचे वर्णन 'घूमजाव-सरकार' असे करता येईल. खरे तर ताजी माघार ज्या प्रकरणी केंद्राने घेतली तो जुनी निवृत्ती योजना रद्द करून त्याजागी कर्मचाऱ्यांचा आर्थिक सहभाग असलेली नवी निवृत्ती योजना आणणे हा अत्यंत स्तुत्य निर्णय होता. तो आता बदलून अर्धी नवी-अर्धी जुनी अशी एक मध्यममार्गी योजना आणण्याची घोषणा नरेंद्र मोदी सरकारने केली. हे; चार पावले मागे जाणे टाळून दोन पावले मागे जाण्यासारखे. पण माघार ती माघार. हे सत्य नाकारता येणारे नाही. तेव्हा नव्या योजनेने काय साधले जाईल यावर भाष्य करण्याआधी जुन्याचे काय झाले याचा आढावा घ्यायला हवा.

आता नव्या निर्णयाप्रमाणे केंद्रीय कर्मचाऱ्यांस आपल्या वेतनाचा काही भाग निवृत्तिवेतनासाठीच्या वर्गणीसाठी द्यावा लागेल. पण त्यापेक्षा अधिक रक्कम केंद्र सरकार घालेल. आधी हा वाटा १४ टक्के इतका होता. तो आता १८.५ टक्क्यांवर जाईल. म्हणजे कर्मचाऱ्याने दहा रुपये दिल्यास केंद्र सरकार १८.५० रु. स्वत:च्या तिजोरीतून घालेल. या नव्या मध्यममार्ग योजनेमुळे किमान दहा वर्षे सेवा झालेल्या कर्मचाऱ्यास दरमहा किमान १० हजार रु. इतके निवृत्तिवेतन मिळू शकेल आणि अन्यांस निवृत्तीआधीच्या १२ महिन्यांच्या सरासरी मूळ वेतनाच्या निम्मी रक्कम निवृत्तिवेतनापोटी मिळू शकेल. ''सरकारचा वाटा १४ टक्क्यांवरून १८.५ टक्के इतका वाढवल्याने निवृत्तांस आर्थिक स्थैर्य आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळेल'' असे पंतप्रधान म्हणतात. कर्मचाऱ्यांच्या स्थैर्याचा विचार आताच येण्यामागे लोकसभा निवडणुकीने लादलेले अस्थैर्य आहे हे समजून घेण्यासाठी पांडित्याची गरज नाही. आता केंद्रानेच अशी हाय खाल्लेली पाहिल्यावर विविध राज्य सरकारेही त्याच मार्गाने जाणार हे उघड आहे. यात धोका आहे तो आर्थिक बेजबाबदारपणाची स्पर्धा सुरू होण्याचा. केंद्र नव्या निवृत्ती योजनेत १८.५ टक्के वाटा उचलणार आहे. अधिक लोकप्रिय होण्याच्या नादात काही राज्यांकडून तो वाढवला जाण्याची शक्यता अजिबात नाकारता येत नाही. आधीच खरे तर राज्य सरकारच्या महसुलातील जवळपास ६० टक्के इतकी रक्कम वेतन, निवृत्तिवेतन आणि जुन्या कर्जांवरील व्याजाची परतफेड यासाठी खर्च होते. नव्या योजनेमुळे यात वाढ होईल, हे निश्चित. या संदर्भात रिझर्व्ह बँकेने दिलेल्या माहितीनुसार २०२३-२४ या वर्षात समस्त भारतवर्षात निवृत्तिवेतनापोटी झालेला केंद्र/ राज्ये/ केंद्रशासित प्रदेश यांचा एकूण खर्च ५ लाख २२ हजार १०५ कोटी रुपयांहून अधिक आहे. इतकी प्रचंड रक्कम गतवर्षी केवळ निवृत्तिवेतनावर खर्च होत असेल तर शिक्षण, आरोग्य, रस्ते आदी सुविधा आपल्याकडे इतक्या भिकार का याचे उत्तर मिळेल.

## आनंद चॅरिटेबल ट्रस्ट आयोजित महा दहीहंडी उत्सव २०२४ पारितोषिकांचे मानकरी खालीलप्रमाणे...

ठाणे - प्रथम पारितोषिक मुंबईतील गोविंदा पथकांसाठी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाची सन्मानचिन्ह व १ लाख ११ हजार १११ रोख रक्कम अखिल गोविंदा पथक डोंगरी अंधेरी पूर्व यांना देण्यात आले (८ थर)

शिवतेज महिला गोविंदा पथकाला मासाहेब मीनाताई ठाकरे नावाची सन्मान चिन्ह व २५ हजार रुपयाची रोख बक्षीस ( ६थर)

ठाण्यातील गोविंदा पथकांसाठी गुरुवर्य धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या नावाची सन्मानचिन्ह व रोख रक्कम २७ हजार ५०० (७ थर)

१ गौरीशंकर सिद्धिविनायक गोविंदा पथक चंदनवाडी ठाणे
२ सिगनगर राजा गोविंदा पथक हंस नगर खोपट ठाणे
३ ओम साई गोविंदा पथक चंदनवाडी ठाणे
४ साईबा गोविंदा पथक सिद्धेश्वर तलाव खोपट ठाणे व इतर थर लावून सलामी देणाऱ्या गोविंदा पथकाला रोख रक्कम देऊन सन्मानित केले







## टुरीस्ट बसमधून वन्यजीव तस्करी



### वन्यजीव रक्षकांच्या छापेमारीत तीन दुर्मिळ पक्षांसह ३० पोपट आणि कबुतरांची मुक्तता





ठाणे - खाजगी टुरिस्ट बसमधून वन्यजीवांच्या तस्करीचा डाव डब्लु डब्लु ए (वाईल्ड वेल्फेअर असोसिएशन) या वन्यजीव संरक्षक संघटनेने उधळला आहे. भिवंडी पडघा येथे केलेल्या या कारवाईत वन्यजीव रक्षकांनी तीन दुर्मिळ पक्षांसह ३० पोपट आणि कबुतरांना वनविभागाच्या स्वाधीन केले. हे वन्यजीव मुंबईतील कॉफर्ड मार्केटमध्ये विक्रीसाठी नेण्यात येत होते.अशी माहिती डब्लु डब्लु एचे मानद वन्यजीव रक्षक राकेश मोहिते यांनी दिली.

मालेगाव येथून २५ ऑगस्ट रोजी खाजगी टुरीस्ट बसच्या बॅटरीच्या कंपार्टमेंटमेंटमध्ये लपवुन काही जण वन्यजीवांची तस्करी करीत असल्याची माहिती डब्लु डब्लु ए ला मिळाली.त्यानुसार,ठाणे जिल्हा वन्यजीव रक्षक राकेश मोहिते, सदस्य सुशील गायकवाड, अभिजीत मोरे, श्लोक सिंग, सुवेद रासम आदीनी पडघा टोलनाक्यावर फिल्डिंग लावली. तसेच टोल नाका क्रॉस करण्यापूर्वी पोलिसांच्या मदतीने बस थांबवुन आपल्या एका सदस्याला बसमध्ये चढवला. त्यानंतर वनविभागाच्या मदतीने बस ठाण्यात आल्यावर बसची झाडाझडती घेतली असता लक्झरी बसच्या बॅटरीच्या कंपार्टमेंटमेंटमध्ये ३० रोझ रिंग पॅराकीट (पोपट),तीन दुर्मिळ ब्लॅक शोल्डर विंग काईट आणि कबुतरे व कोंबड्या असा मुद्देमाल हस्तगत केला.यातील कोंबड्या वगळता अन्य वन्यजीवांची पशुवैद्यकिय तपासणी करून त्यांची वन अधिवासात मुक्तता करण्यात आली. हे वन्यजीव मुंबईतील मदनपुरा, कॉफर्ड मार्केट येथे विक्रीसाठी नेण्यात येणार होते.

दरम्यान,वन्यजीव (संरक्षण) अधिनियमाच्या कायद्यानुसार वन्यजीवांची विक्री करणे किंवा जवळ बाळगणे याकरीता कारावासाची शिक्षा किंवा १ लक्ष दंडाची अथवा दोन्ही शिक्षेची तरतुद आहे. तरी, कोणीही वन्यप्राण्यांची शिकार, विक्री किंवा जवळ बाळगु नये. असे आवाहन वन विभागाकडून करण्यात आले आहे.

## डायघर पोलीस आणि गंगामाता वाहन शोध संस्थेची कामगिरी

### दोन दिवसात बेवारस पडलेल्या ७७ वाहन मूळ मालकांचा लावला शोध

ठाणे - ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील डायघर पोलीस ठाण्यात अनेक वर्ष बेवारस पडून राहिलेल्या जप्त केलेल्या वाहनांच्या मूळ मालकांचा शोध लावून कचरा साफ करण्याच्या प्रयत्नाला चांगले यश लाभलेले आहे. डायघर पोलीस आणि गंगामाता वाहन शोध संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या शोध मोहिमेत तब्बल ७७ वाहनाच्या मूळ मालकांचा शोध लावण्यात यश मिळालेले आहे.

विविध गुन्ह्यात जप्त केलेल्या वाहनाचा खच पोलीस ठाण्याच्या अवतीभवती असल्याने अनेकवर्ष या गाड्या पडून असल्याने दुर्गंधी आणि रोगराई पसरविण्याचे काम करीत असल्याने ही बेवारस वाहने पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने घातक ठरत असल्याने डायघर पोलिसांनी आणि गंगामाता वाहन शोध संस्था यांच्या संयुक्त मोहिमेत ७७ वाहनाचे मूळ मालक शोधण्यात यश मिळालेले आहे. अनेक गुन्ह्यात जप्त वाहने ही न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करून मालकांना कागदपत्र दाखवून देण्यात येतात. मात्र काही गुन्ह्यातील जप्त वाहनांचे मूळ मालक वाहनांसाठी संपर्क साधत नसल्याने सादर भंगार वाहने हि पोलीस ठाण्याच्या आवारात पडून राहतात. यात काही वाहने हि न्यायालयीन प्रक्रियेसाठी सांभाळून ठेवण्यात येतात. त्यात भंगार वाहने ज्यांचे मालक नाहीत अशी वाहनांची भर पडते. सादर वाहनांच्या मूळ मालकांचा शोध घेण्यासाठी संस्थेची मदत घेण्यात आली.

### ठाणे पोलीस आयुक्तांच्या आदेशावर पोलीस पथकाने केली कामगिरी

ठाणे शहर पोलीस आयुक्त आशुतोष डुबरे यांनी बेवारस वाहनांच्या मालकाचा शोध घेवुन ती वाहने त्यांच्या ताब्यात देण्याचे आदेश प्रभारी अधिकाऱ्यांना दिले. त्यानुसार पोलीस सह आयुक्त चव्हाण अपर पोलीस आयुक्त देशमुख परिमंडळ-१ चे पोलीस उप आयुक्त बुरसे सर, कळवा विभागाचे सहा पोलीस आयुका कोळेकर व शिळ डायघर पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदिपान शिदे यांचे मार्गदर्शनानुसार पोलीसांनी परंदवाडी तळेगाव दाभाडे, ता मावळ, जि. पुणे येथील महाराष्ट्रात अग्रेसर असलेल्या गंगामाता वाहन शोध संस्थेची मदत घेतली. संस्थेचे कार्यकर्ते आणि पोलीसांनी बेवारस वाहनांचे चेसीस आणि इंजिन नंबरच्या आधारावर दोन दिवसात ७७ वाहनाच्या मुळ मालकाचा शोध लावला. त्यासाठी पोलीस निरीक्षक (गुन्हे) सुनिल वरुडे, पो हया/भरत जाधव, पो.कळे, पो.ना/ राजेंद्र दणाणे (मुद्देमाल कारकुन पो.ना. गणेश देशमुख यांच्यासह गंगामाता वाहन शोध संस्थेचे अध्यक्ष बागडे, आणि इतरांनी परिश्रम घेतले. तसेच ज्या मालकाची वाहने असतील त्यांनी पोलीस ठाणेस पेवुन आपले वाहन तपासून घेवुन आये. तसेच सदरचे वाहन चेवुन त्यास कायदेशीर प्रक्रीया पुर्ण करून त्यांचा लिलाव केला जाईल व त्यातुन आलेली रक्कम सरकारी विजोरीत भरण्यात येईल असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिंदे यांनी सांगीतले.

## भाजपचे भ्रष्टाचारी सरकार महाराजांना देखील सोडत नाही, आदित्य ठाकरे यांचा घणाघात

**(पान १ वरून) नारायण राणे म्हणाले, 'घरात खेचून एकेकाला रात्रभर मारून टाकेन', फडणवीसांची पहिली प्रतिक्रिया –** छत्रपती शिवाजी महाराजांचा राजकोट येथील पूर्णाकृती पुतळा कोसळल्यानंतर आज महाविकास आघाडीचे नेते पाहणीसाठी तिथे गेले. विशेष म्हणजे भाजप खासदार नारायण राणे आणि भाजप नेते निलेश राणे हे देखील कार्यकर्त्यांसह तिथे पोहोचले. यावेळी ठाकरे गटाचे कार्यकर्ते आणि राणे समर्थक यांच्यात मोठा राडा झाला. जवळपास दोन तासांपेक्षा जास्त वेळ राजकोट किल्ल्यावर हायव्होल्टेज घडामोडी घडल्या. अखेर पोलीस आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या मध्यस्थीने प्रकरण निवळलं. यावेळी संतापात असलेले नारायण राणे यांनी वादग्रस्त वक्तव्य केलं. घरात खेचून एकेकाला रात्रभर मारून टाकेन, असं नारायण राणे म्हणाले. त्यांच्या या वक्तव्यावर विरोधकांकडून जोरदार टीका होत असताना राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेवर प्रतिक्रिया दिली. राणेंची बोलण्याची पद्धत आहे. ते बोलताना आक्रमक असतात. पण ते धमक्या देतील असं माहीत नाही, अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी दिली. ज्याप्रकारे शिवरायांच्या पुतळ्याची घटना आहे. त्यावर कोणीच राजकारण करू नये हे मत आहे. ही घटना सर्वांसाठी कमीपणा आणणारी आहे. दुःखद आहे. त्याचवेळी अशी घटना झाल्यावर त्याची योग्य चौकशी झाली पाहिजे. दोषींवर कारवाई झाली पाहिजे. तिथे भव्य पुतळा उभारला पाहिजे. या तिन्ही गोष्टीची कार्यवाही सुरू आहे. नेव्हीने चौकशी समिती स्थापन केली आहे. नेव्ही या संदर्भात चौकशी करून कारवाई करेल. दोषींवर कारवाई करेल. घटनेकरता कोणती गोष्ट जबाबदार होती. त्यात कोणती त्रुटी होती ते पाहिल, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

**'खालच्या प्रकारचं राजकारण करू नका'** – पीडब्ल्यूडीने गुन्हा दाखल केला आहे. पोलीसही कारवाई करणार आहे. मुख्यमंत्री म्हणाले की, नेव्हीला मदत करून भव्य पुतळा उभा करू. ही घटना घडल्यावर जी जी गोष्ट करायचं ते करत आहोत. पण त्याचवेळी प्रत्येक गोष्टीत राजकारण करायचं, प्रत्येक गोष्टीला निवडणुकीच्या चष्म्यातून पाहायंच असं खालच्या प्रकारचं राजकारण करू नये. अशा चुका घडू नये. ज्यांनी चुका केली त्यांना शिक्षा करू. तिथे पुन्हा पुतळा उभा करू, असं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

'या विषयाचं राजकारण करणं महाराष्ट्राला शोभत नाही'

आता कोणी काय केलं हे बोलणार नाही. पण सर्वांना विनंती आहे, आणि सूचना आहे. या विषयाचं राजकारण करणं महाराष्ट्राला शोभत नाही, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. माजी केंद्रीय मंत्री शरद पवार ज्येष्ठ नेते आहेत. हा पुतळा नेव्हीने तयार केला आहे. तो राज्य सरकारने तयार केला नाही हे त्यांना माहीत आहे. एका ठिकाणी भ्रष्टाचाराचं तारतम्य आणि दुसरीकडे नाही असं कसं म्हणायचं. इतर ठिकाणच्या भ्रष्टाचाराला पवार साहेब समर्थन करतात का. निवडणुका पाहून वक्तव्य केलं जात आहे. पवारांसारख्या ज्येष्ठ नेत्यांना शोभत नाही, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## आनंद दिघे यांच्या पुण्यतिथीनिमित्त महाआरोग्य शिबिराचे आयोजन

**(पान १ वरून)** ठाणे येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे प्रणित शिव आरोग्य सेना (ठाणे जिल्हा) तसेच हेल्प मेडिकल चॅरिटेबल ट्रस्ट आणि शिवसेना शाखा चंदनवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने महाआरोग्य शिबिर संपन्न झाले हे आरोग्य शिबिर ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालय तसेच ठा.म.पा. (सार्वजनिक आरोग्य विभाग) आणि झेडुज यांच्या मार्फत घेण्यात आले होते.या शिबिरात स्त्री रोग, अस्थीरोग, त्वचा रोग,सामान्य तपासनी, मेमोग्राफी,लिव्हर(यकृत) सोनोग्राफी इत्यादी उपस्थित रुग्णांच्या तपासणी करण्यात आली, ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालयाचे तज्ञ डॉक्टरर्स,परिचारिका,स्टाफ त्याचप्रमाणे ठा.म.पा. (सार्वजनिक आरोग्य विभागाचे) टेक्नीशियन,परिचारिका इतर स्टाफ तसेच झेडुज या कंपनीचे टेक्नीशियन तसेच ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ.कैलास पवार,आणि ठा.म.पा. सार्वजनिक आरोग्य विभागाचे डॉ. वर्षा ससाने व मेमोग्राफी युनिटच्या डॉ समिधा गोरे यांचे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सह संघटक राजेंद्र शिंदे.विधानसभा पदाधिकारी सचिन त्रिवेदी, अजित चव्हाण, अजिम शेख,देवशी राठोड, उल्हास शिवणेकर, अक्षता पांचाळ, सुरेश भोसले, उपशहरप्रमुख वसंत गव्हाळे,विभाग प्रमुख-जिवाजी कदम, प्रकाश पायरे,महिला विभाग संघटक देशपांडे मॅडम, उपविभागप्रमुख- दत्ता सावंत, सुभाष वालगुडे, रविंद्र मोरे, सुरेश सावंत, हरिश्चंद्र काळे, मनोज गुप्ता, दत्ता जाधव. शाखाप्रमुख- ज्ञानेश्वर बागवे, धोंडीराम मोरे,भास्कर शिर्के, सचिन कार्डिले, दिनेश खाडे, डिजीटल शाखा प्रमुख अभिजीत कदम, महिला शाखाप्रमुख सुर्वना कंद उपशाखाप्रमुख संगीता दानवले,हेल्प मेडिकल चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त अनिल ढोपे, रमेश वर्तक, हरिश्चंद्र मांडवकर आदींनी विशेष मेहनत घेतली.

## रायलादेवी तलाव येथे गणेश मूर्ती विसर्जन आणि छट पूजा यांच्यासाठी केली जाणार पुरेशी व्यवस्था

**(पान १ वरून)**अंफी थिएटर, तसेच एका बाजूच्या पायवाटेचे काम झाले आहे. या कामाची पाहणी केल्यानंतर, गणेश मूर्ती विसर्जन तसेच छट पूजा यांच्यासाठी आवश्यक असलेल्या गोष्टी लक्षात घेवून त्याप्रमाणे व्यवस्था करण्याच्या सूचना महानगर आयुक्त मुदगल यांनी एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

तसेच, ही कामे योग्य वेळेत पूर्ण करण्यात यावीत. त्यात कोठेही गुणवत्तेत तडजोड करू नये, असे महापालिका आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

विसर्जन आणि छट पूजेसाठी येथे येणाऱ्या हजारो भाविकांना चांगल्या सुविधा मिळतील. सुशोभीकरण झाल्यावर येथे यापूर्वीपेक्षा अधिक जागा भाविकांसाठी उपलब्ध होणार आहे. त्याचवेळी, भाविकांनीही सुशोभित तलावाची काळजी घ्यावी, अशी अपेक्षा माजी ज्येष्ठ नगरसेवक राम रेपाळे आणि एकनाथ भोईर यांनी व्यक्त केली. याप्रसंगी, महापालिकेचे नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, उपनगर अभियंता विकास ढोले, शुभांगी केसवानी, मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान आदी अधिकारी उपस्थित होते.

## ठाण्यात जखमी गोविंदाची संख्या २२ वर, बहुतांश किरकोळ जखमी

**(पान १ वरून)** घेणाऱ्या गोविंदाची संख्या आता २२ वर पोहचलेली आहे. यापैकी बहुतांश गोविंदांना मुक्का मर तर कांही गोविंदांना अधिक मर लागल्याची माहिती वैद्यकीय अधिकारी यांनी दिली. दुसरीकडे अनेक गोविंदावर उपचार करून त्यांना घरी सोडण्यात आल्याची माहिती वैद्यकीय अधिकारी यांनी दिली.




(छाया - मनोज सिंह)

ठाणे येथे क्लस्टर डेव्हलपमेंट योजनेच्या विरोधात एकता संघ गाव बचाव कृती समिती मानपाडा, मनोरमा नगर, आझाद नगर समिती च्या मार्गदर्शनाखाली आंदोलन पुकारले आहे. रहिवाश्यांना आपल्या घरांची चिंता वाटत आहे. त्यांना बेघर होण्याची भीती सतावत आहे. ही क्लस्टर योजना नेमकी काय महापालिका प्रशासन काही बोलत नाही नंबरींग करून जात आहे. आमची घरे बिल्डर च्या घशात घालण्याचा डाव महापालिका प्रशासनाने आखला आहे असं रहिवाश्यांना वाटतं आहे म्हणून हजारो नागरिक रस्त्यावर येऊन आपल्या तीव्र भावना व्यक्त करत आहेत.रहिवाश्यांची एकच मागणी आहे महापालिकाने आता सार्वजनिक बैठक घेऊन आमच्या प्रश्नांची उत्तरे दिली पाहिजे अता आमचे लोकप्रतिनिधी ही काही बोलत नाहीत उघड भूमिका घेत नाहीत त्यांचा या योजनेला पाठिंबा आहे का विरोध आहे काही सांगत नाहीत.

## जाहीर सूचना

तामाम जनतेस हे कळवण्यात येते की माझे आशील श्री. प्रकाश लक्ष्मण आणि कै. रजालक्ष्मी प्रकाश ह्यांच्या मालकीची सदनिका क्र. १३ आणि १४, इमारत क्र. २७/बी, श्यामकुटीर को-ऑप. हौ. सोसा., वृंदावन संकुल, ठाणे (प), ४००६०१, तसेच संबंधित सदनिकेचे सोसायटी शेअर्स क्र. - १३१ ते १३५ आणि १३६ ते १४० यांचेही ते मालक आहेत. माझ्या अशीलांनी सदरच्या मालमत्तेसाठी आणि शेअर्स साठी त्यांची कन्या नामे कन्या, कु. संजना प्रकाश हिस नॉमिनी नेमले आहे.

माझे आशील वरील नमूद सदनिका विकण्याचा मानस बाळगतात. कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेकडे वरील मालमत्तेवर वारसा, गहाण, तारण किंवा कोणत्याही कायदेशीर मार्गाने हक्क, दावा किंवा स्वारस्य असल्यास, त्यांनी त्यांच्या सर्व पुराव्यासह, ह्या सूचनेच्या प्रसिद्धीपासून १५ दिवसांच्या आत आमच्याकडे लेखी दावे सादर करावेत.

निर्धारित मुदतीत दावे सादर न केल्यास, असे गृहीत धरले जाईल की असे कोणतेही दावे अस्तित्वात नाहीत.

**तन्वी सं. डांगे**
ऑफिस नं. ४५, अल्टिमेट बिझनेस सेंटर,
कुर्रेमजी बिल्डिंग, १११/ए, एम. जी. रोड,
मुंबई विद्यापीठासमोर, फोर्ट, मुंबई- ४०० ००१.

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that our client Mr Dheeraj Yadav has agreed to purchase undivided 9 Gunthas i.e. 9801 sq. ft. of land forming portion of land bearing Survey No 77, Hissa No. 3 situated at Dahisar Mori, Valivali, Thane - 400612 within the limits of Thane Municipal Corporation (refer to as "Said Land") from Hari Ambo Patil, Gangabai Dagdu Mhatre, Mainabai Ambo Patil, Katorbai Laxman Mundhe, Ganesh Ambo Patil, Shankunath Ambo Patil, Sangita Ambo Patil, Vithabai Ambo Patil. The person having claim or objection against or to the said land by way of agreement, exchange, mortgage or otherwise is required to make same known in writing with documents to the undersigned at M/S Being Vakil Associates, CF-30, Metro Plaza, Kalyan-Shil Rd, Kalyan (E.) 421306 within 15 days from the date of this notice falling which, it shall be assumed that, no any person(s) has any claim, whatsoever, on the said land of which please take a note.

**Date: 27/08/2024**

Being Vakil Associates

(Advocates)

## ठाणे महानगरपालिका, ठाणे

मुख्य लेखा व वित्त विभाग
मुदत ठेवी ठेवणेसाठी व्याजदर मागविणेबाबत

ठाणे महानगरपालिकेच्या परिभाषित निधी, भविष्य निर्वाह निधी, शिक्षण – भनिनि, इतर शासकीय निधी, Bsup kaksha, शहर विकास निधी व १५ वा वित्त आयोग या खात्यामधील रक्कमेची गुंतवणूक करणेसाठी ठाणे महापालिका क्षेत्रातील फक्त राष्ट्रियकृत बँकांकडून व्याजदर मागविणेत येत आहेत. तरी, ठाणे महापालिका क्षेत्रातील राष्ट्रियकृत बँकांनी व्याजदर, ग्राहय दिनांक इ, माहिती ठाणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरील तक्त्यानुसार माहिती व व्याजदर नमूद करुन cafoinvest@thanecity.gov.in या email वर अथवा मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे नावे मुख्य लेखा विभाग दुसरा मजला, ठाणे महापालिका मुख्यालय, पाचपाखाडी ठाणे येथे दि.**३०/०८/२०२४** रोजी पर्यंत स्वतंत्र पत्र देऊन व्याजदर देण्यात यावेत, तदनंतर प्राप्त व्याजदराच्या पत्राचा विचार करण्यांत येणार नाही.अधिक माहिती www.thanecity.gov.in येथे उपलब्ध आहे.

ठामपा/पिआरओ/लेवविवि/३७६/२०२४-२५ सही/-
दि:२८.०८.२०२४ मुख्य लेखा व वित्त अधिकारी
**Pls visit our oficial web-site** ठाणे महानगरपालिका,ठाणे
**www.thanecity.gov.in**

## नवी मुंबई महानगरपालिका

**शहर अभियंता विभाग**

**निविदा सूचना क्र. नमुंमपा/का.अ.(नेरूळ)/ 11 /2024-25**

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकिय रक्कम (रू.) |
|---|---|---|
| 1 | नेरुळ से-18 ए येथील तलाव परिसरातील गटाराला वॉटर चेंबर बसविणे. | रु.4,20,180/- |
| 2 | शिरवणे येथील गावदेवी मैदानामधील एंट्री गेटची सुधारणा करणे. | रु.3,02,476/- |
| 3 | शिरवणे गावियो व से. 01 येथील गटारांवर आर. सी. सी. कव्हर्स बसविणे. | रु.3,65,539/- |
| 4 | नेरुळ टीटीसी औद्योगिक क्षेत्रातील रहेजा युनिव्हिर्सल जवळील नाल्याची साफ सफाई करणे. | रु.5,53,576/- |

**निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-Tendering) संगणकप्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक- 29/ 08 /2024 रोजी प्राप्त होतील. निविदेचे सादरीकरण https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online करण्याचे आहे. ई-निविदा ई-टेंडरिंग (E-Tendering) प्रक्रियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणींसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबर वर संपर्क करावे.**

**कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकरण्याचा अधिकार मा. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.**

सही/-
**विवेक द मुळये**
**कार्यकारी अभियंता (नेरुळ)**
**नवी मुंबई महानगरपालिका**

**जा.क्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/289/2024**

## भारतीय सैन्य दल

■ पदाचे नाव तपशील:
पद क्र. पदाचे नाव पद संख्या
१ हवालदार - २ नायब सुभेदार -
■ क्रीडा पात्रता: ॲथलेटिक्स, तिरंदाजी बास्केटबॉल बॉक्सिंग, डायव्हिंग, फुटबॉल, तलवारबाजी, जिम्नॅस्टिक्स, हॉकी, हँडबॉल, कबड्डी. ज्यांनी वर नमूद केलेल्या कोणत्याही खेळ आणि खेळांमध्ये खालीलप्रमाणे प्रतिनिधित्व केले आहे:- (E) व्यक्ती राष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्याचे प्रतिनिधित्व करून कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर पदक विजेता असावी किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर (इंडल इव्हेंट) देशाचे प्रतिनिधित्व केले असेल. (ab) व्यक्तीने कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर (सांघिक स्पर्धा) राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्य किंवा देशाचे प्रतिनिधित्व केलेले असावे. (ac) वैयक्तिक खेळो इंडिया गेम्स आणि युथ गेम्समध्ये पदक विजेता असावा.
■ शैक्षणिक पात्रता: पद क्र.१: १०वी उत्तीर्ण पद क्र.२: १०वी उत्तीर्ण
■ वयाची अट: जन्म ०१ ऑक्टोबर १९९९ ते ३० सप्टेंबर २००६ दरम्यान झालेला असावा.
■ अर्ज पाठविण्याचा पत्ता: Directorate of PT Sports General Staff Branch IHQ of MoD (Army) Room No 747 "A' Wing, Sena Bhawan PO New Delhi -110 011
■ अर्ज पोहचण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ वेबसाईट https://www.indianarmy.nic.in/

## महाराष्ट्र राज्य नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग

■ जाहिरात क्र.: ०१/२०२४
■ जागा : २८९
■ पदाचे नाव :
१ रचना सहायक (गट ब)
२ उच्चश्रेणी लघुलेखक (गट ब)
३ निम्न श्रेणी लघुलेखक (गट ब)
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: स्थापत्य किंवा ग्रामीण आणि स्थापत्य/नागरी व ग्रामीण किंवा वास्तुशास्त्र किंवा बांधकाम तंत्रज्ञान डिप्लोमा
पद क्र.२: (i) १०वी उत्तीर्ण उत्तीर्ण (ii) लघुलेखन १२० श.प्र.मि. (iii) इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. किंवा मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि.
पद क्र.३: (i) १०वी उत्तीर्ण उत्तीर्ण (ii) लघुलेखन १०० श.प्र.मि. (iii) इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. किंवा मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि.
■ वयाची अट: २९ ऑगस्ट २०२४ रोजी १८ ते ३८ वर्षे मागासवर्गीय/आ.दु.घ.: ०५ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : खुला प्रवर्ग: १०००/- मागासवर्गीय: ९००/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २९ ऑगस्ट २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://dtp.maharashtra.gov.in/

## भारतीय रेल्वे

■ जागा : ७९५१
■ पदाचे नाव :
१ केमिकल सुपरवाइजर/रिसर्च
२ मेटलर्जिकल सुपरवाइजर/रिसर्च
३ ज्युनियर इंजिनिअर
४ डेपो मटेरियल सुपरिटेंडंट
५ केमिकल मेटलर्जिकल असिस्टंट
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: केमिकल टेक्नोलॉजी पदवी.
पद क्र.२: मेटलर्जिकल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.३: इंजिनिअरिंग डिप्लोमा (Mechanical / Electrical / Electronics/ Civil/ Mechanical / Production / Automobile / Instrumentation and Control / Manufacturing / Mechatronics / Industrial / Machining / Tools and Machining / Tools and Die Making / Automobile / Information Technology / Communication Engineering / Computer Science and Engineering / Computer Science / Computer Engineering)
पद क्र.४: कोणत्याही विषयातील इंजिनिअरिंग डिप्लोमा.
पद क्र.५: ४५% गुणांसह B.Sc (Physics/ Chemistry)
■ वयाची अट: ०१ जानेवारी २०२५ रोजी १८ ते ३६ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/ OBC/EWS: 500/- SC/ST/ ExSM²/ट्रान्सजेंडर/EBC/महिला: २५०/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २९ ऑगस्ट २०२४
■ अर्ज दुरुस्ती: ३० ऑगस्ट ते ०८ सप्टेंबर
■ वेबसाईट https://indianrailways.gov.in/




■ पदाचे नाव :
१ डायटीशियन
२ नर्सिंग सुपरिटेंडेंट
३ ऑडिओलॉजिस्ट स्पीच थेरेपिस्ट
४ क्लिनिकल सायकोलॉजिस्ट
५ डेंटल हाइजीनिस्ट
६ डायलिसिस टेक्निशियन
७ हेल्थ मलेरिया इंस्पेक्टर ग्रेड III
८ लॅब सुपरिटेंडेंट ग्रेड III
९ पर्फ्युजनिस्ट
१० फिजियोथेरेपिस्ट ग्रेड II
११ ऑक्यूपेशनल थेरेपिस्ट
१२ कॅथ लॅब टेक्निशियन
१३ फार्मासिस्ट
१४ रेडिओग्राफर एक्स-रे टेक्निशियन
१५ स्पीच थेरपिस्ट
१६ कार्डियाक टेक्निशियन
१७ ऑप्टोमेट्रिस्ट
१८ ECG टेक्निशियन
१९ लॅब असिस्टंट ग्रेड II
२० फील्ड वर्कर
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: B.Sc + डायटीशियन PG डिप्लोमा किंवा B.Sc (Home Science) + M.Sc Home Science (Food and Nutrition)
पद क्र.२: GNM² किंवा B.Sc (Nursing)
पद क्र.३: B-SLP
पद क्र.४: पदव्युत्तर पदवी (Clinical Psychology / Social Psychology)
पद क्र.५: (i) B.Sc (Biology) (ii) डेंटल हाइजीन डिप्लोमा (iii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.६: B.Sc.+डिप्लोमा (Haemodialysis) किंवा ०२ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) B.Sc.(Chemistry) (ii) हेल्थ / सॅनिटरी इंस्पेक्टर डिप्लोमा किंवा NTC (Health Sanitary Inspector)
पद क्र.८: B.Sc (Bio-Chemistry / Micro Biology / Life science)+DMLT किंवा B.Sc (Medical Technology)
पद क्र.९: B.Sc + डिप्लोमा (Perfusion Technology) किंवा B.Sc + ०३ वर्षे अनुभव
पद क्र.१०: (i) फिजिओथेरेपी पदवी (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.११: (i) १२वी उत्तीर्ण (ii) ऑक्यूपेशनल थेरेपी डिप्लोमा/पदवी
पद क्र.१२: B.Sc+ डिप्लोमा (Cardiac Professional Cath Lab work) किंवा ०२ वर्षे अनुभव
पद क्र.१३: १२वी उत्तीर्ण+D.Pharm किंवा B.Pharma
पद क्र.१४: १२वी उत्तीर्ण (PhysicsChemistry) (ii) डिप्लोमा (Radiography/ X Ray Technician/ Radiodiagnosis Technology)
पद क्र.१५: (i) B.Sc (ii) डिप्लोमा (Audio and Speech Therapy) (iii) २ वर्षे अनुभव
पद क्र.१६: १२वी (Science) उत्तीर्ण किंवा डिप्लोमा (Cardiology Lab)
पद क्र.१७: B.Sc (Optometry) किंवा (Ophthalmic Technician)
पद क्र.१८: (i) १२वी उत्तीर्ण /B.Sc (ii) डिप्लोमा/पदवी (ECG Laboratory Technology / Cardiology /Cardiology Technician / Cardiology Techniques )
पद क्र.१९: (i) १२वी उत्तीर्ण (ii) DMLT
पद क्र.२०: १२वी उत्तीर्ण (Biology/ Chemistry)
■ वयाची अट: ०१ जानेवारी २०२५ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१,४,५,७,८,१०, ११, १२, १५ ते १९: १८ ते ३६ वर्षे
पद क्र.२: २० ते ४३ वर्षे
पद क्र.३: २१ ते ३३ वर्षे
पद क्र.६: २० ते ३६ वर्षे
पद क्र.९: २१ ते ४३ वर्षे
पद क्र.१३: २० ते ३८ वर्षे
पद क्र.१४: १९ ते ३६ वर्षे
पद क्र.२०: १८ ते ३३ वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: ५००/- SC/ST/ExSM²/ /EBC/महिला: २५०/-
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १६ सप्टेंबर २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत संकेतस्थळ https://indianrailways.gov.in/

## भारतीय सर्वोच्च न्यायालय

■ जागा : ८० जागा
■ पदाचे नाव:
१ ज्युनियर कोर्ट अटेंडंट (स्वयंपाकाचे
■ शैक्षणिक पात्रता: (i) १०वी उत्तीर्ण (ii) पाककला डिप्लोमा (iii) ०३ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी १८ ते २७ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: दिल्ली
■ Fee: General/OBC: ४००/- SC/ST/PWD/ExSM²: २००/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: १२ सप्टेंबर २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://www.sci.gov.in/

## केंद्रीय लोकसेवा आयोग

■ पदाचे नाव :
१ डेप्युटी सुपरिटेंडिंग आर्कियोलॉजिस्ट ६७
२ केबिन सेफ्टी इंस्पेक्टर १५
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) पदव्युत्तर पदवी (Archaeology/Indian History/-nthropology) (ii) PG डिप्लोमा/ एडवांस डिप्लोमा (Archaeology) किंवा ०३ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) १२वी उत्तीर्ण (ii) केबिन क्रू म्हणून दहा वर्षांचा अनुभव आणि सध्या केबिन क्रू म्हणून कार्यरत.
■ वयाची अट: ०५ सप्टेंबर २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: ३५ वर्षांपर्यंत
पद क्र.२: ४० वर्षांपर्यंत
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: २५/- SC/ST/PH/महिला: फी नाही
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०५ सप्टेंबर २०२४ (११:५९ PM²)
■ अधिकृत वेबसाईट https://upsc.gov.in/

## उत्तर रेल्वे

■ पदाचे नाव :
१ अप्रेंटिस (प्रशिक्षणार्थी) ४०९६
■ शैक्षणिक पात्रता: (i) ५०% गुणांसह १०वी उत्तीर्ण (ii) संबंधित ट्रेड मध्ये ITI
■ वयाची अट: १६ सप्टेंबर २०२४ रोजी १५ ते २४ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: उत्तर रेल्वे
■ Fee: General/OBC: १००/- SC/ST/PWD/महिला: फी नाही
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १६ सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://nr.indianrailways.gov.in/

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

■ पदाचे नाव :
१ राज्य संसाधन व्यक्ती (SRPs)
■ शैक्षणिक पात्रता: (i) पदवीधर/MSW/MBA (ii) मराठी आणि MSऑफिसचे ज्ञान आवश्यक. (iii) ०७ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी ६० वर्षांपर्यंत.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : फी नाही.
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://www.umed.in/

# आर्थिकदृष्ट्या दुर्बल प्रवर्गातील मुलींनो घ्या व्यावसायिक शिक्षण मोफत..!

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग व कृषी व पशु संवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग या विभागांच्या अधिपत्याखालील शैक्षणिक संस्थांद्वारे राबविल्या जाणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणाऱ्या इतर मागास प्रवर्ग, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (एथड) आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग या प्रवर्गातील वार्षिक कौटुंबिक उत्पन्न रु.८ लाखापेक्षा कमी असलेल्या पात्र विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभ देण्यात येतो.**

व्यावसायिक शिक्षणामध्ये मुलींचे प्रमाण ३६ टक्के इतके मर्यादित आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार व्यावसायिक शिक्षणातील मुलींचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने व मुलींना समप्रमाणात शिक्षणाच्या व्यापक संधी प्राप्त व्हाव्या, तसेच महिला सक्षमीकरणांतर्गत आर्थिक पाठबळाअभावी व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेण्यापासून मुली वंचित राहू नयेत, ही बाब विचारात घेऊन राज्य मंत्रिमंडळाच्या दि.५जुलै २०२४ रोजी झालेल्या बैठकीतील विचाराविनिमयांती पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/ तंत्रनिकेतने / सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांस, शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी, ज्या मुलींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे. अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील, इतर मागास प्रवर्गातील, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या मुलींना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागांकडून सध्या देण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के

लाभा ऐवजी १०० टक्के लाभ देण्यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून शासन मान्यता देण्यात आली आहे. तसेच, यासाठी येणाऱ्या रु.९०६.०५ कोटी एवढ्या अतिरिक्त आर्थिक भारासही मान्यता देण्यात आली आहे. शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क यामध्ये १०० टक्के सवलत देण्याच्या योजनेचा लाभ, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नूतनीकरण केलेल्या), महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय दि.०६.०४.२०२३ मध्ये नमूद केलेल्या संस्थात्मक व संस्थाबाह्य या वर्गवारीमध्ये समाविष्ट होणाऱ्या अनाथ मुले व मुली यांनासुध्दा अनुज्ञेय आहे.

मराठा आरक्षण व सुविधा मंत्रिमंडळ उपसमितीच्या निर्णयानुसार ईडब्ल्यूएस प्रवर्गास इतर मागास प्रवर्गाप्रमाणे उत्पन्न मर्यादेचे निकष एकसमान करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने प्रस्तावित केल्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि.०७.१०.२०१७ रोजीच्या शासन निर्णयामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली आहे:-

■ ईडब्ल्यूएस आरक्षणातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत लाभ अनुज्ञेय करताना, ईडब्ल्यूएस प्रमाणपत्राऐवजी आई व वडील (दोन्ही पालकांचे) एकत्रित उत्पन्नावर आधारित सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र अनुज्ञेय करण्यात येत आहे. तथापि, जे विद्यार्थी नोकरीत असतील, त्यांच्या आई-वडील यांच्या उत्पन्नासोबत विद्यार्थ्यांचे उत्पन्न, उत्पन्न प्रमाणपत्रासाठी विचारात घेण्यात यावे.

■ ईडब्ल्यूएस आरक्षणातून शैक्षणिक प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यास, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ प्रथम वर्षाकरीता मिळाल्यानंतर ही सवलत त्याचा अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत अनुज्ञेय राहील. अशा विद्यार्थ्यांना दुसऱ्या वर्षापासून दरवर्षी उत्पन्न प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही.

■ उत्पन्न प्रमाणपत्राबाबतच्या उपरोक्त तरतुदी, संस्थात्मक व संस्थाबाह्य या वर्गवारीमध्ये समाविष्ट होणाऱ्या अनाथ मुले व मुली यांनासुध्दा अनुज्ञेय करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

तरी, व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील, इतर मागास प्रवर्गातील, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या विद्यार्थीनींनी (अर्जाचे नूतनीकरण केलेल्या मुलींसह) या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

**-मनोज शिवाजी सानप**
जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे

# निकोलस पूरनचा पुन्हा 'तडाखा' द. आफ्रिकेचा 'व्हाइट वॉश'!



टी-२० विश्वचषक स्पर्धेतील अंतिम सामन्यातील भारताकडून झालेल्या पराभवाच्या धक्क्यातून दक्षिण आफ्रिका अजूनही सावरलेला नसल्याचे दिसत आहे. वेस्ट इंडिजविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेत संघाला दारुण पराभवाला सामोरे जावे लागले आहे. मंगळवारी रात्री झालेल्या मालिकेतील शेवटच्या सामन्यात वेस्ट इंडिजने दक्षिण आफ्रिकेचा आठ गडी राखून पराभव केला. या सामन्यातही पुन्हा एकदा निकोलसची पूरन बॅट तळपली आणि वेस्ट इंडिजने मालिका ३-० अशी जिंकली. तिसर्या सामन्यात पूरनेला शिमरॉन हेटमायरची भक्कम साथ लाभली. पावसामुळे दक्षिण आफ्रिकेने प्रति डाव १३ षटके असलेल्या या सामन्यात चार गडी गमावून १०८ धावा केल्या. विंडीजने हे लक्ष्य ९.२ षटकांत दोन गडी गमावून पूर्ण केले.

वेस्ट इंडिजने नाणेफेक जिंकून दक्षिण आफ्रिकेला फलंदाजीसाठी निंमत्रण दिले. दक्षिण आफ्रिकेची सुरुवात निराशाजनक झाली. रीझा हँडरिंग्जने २० चेंडू खर्च करत केवळ ९ धावा केल्या. पाचव्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर हेंड्रिक्सला अकिल हुसेनने बाद केले. यानंतर कर्णधार एडन मार्करामने येऊन काही चांगले फटके मारले आणि धावगती वाढवण्याचा प्रयत्न केला. रोमारियो शेफर्डने त्याला दहाव्या षटकात पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. मार्करामने १२ चेंडूत २० धावा केल्या.दुसरा सलामीवीर रायन रिक्लेटन २४ चेंडूत २७ धावा करून बाद झाला. ट्रिस्टन स्टब्सच्या १५ चेंडूत ५ चौकार आणि ३ षटकारांच्या मदतीने ४० धावांच्या खेळीने संघाने १०८ धावापर्यंत मजल मारली.

पूरन आणि हेटमायरची तुफानी खेळी

विजयासाठी वेस्ट इंडिजसमोर १३ षटकांमध्ये १०९ धावांचे लक्ष्य होते. पहिल्याच षटकात सलामीवीर अलेक अथांज तंबूत परतला. यानंतर पूरन याने शाई होपसह डावाची धुरा सांभाळली. होप आणि पूरण यांच्यात ५८ धावांची भागीदारी झाली. १३ चेंडूत चार षटकार आणि दोन चौकारांची तुफानी खेळी करत पूरन बाद झाला. त्याच्या हेटमायरने धावफलक हालता ठेवला. हेटमायरने १७ चेंडूंत चार चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने नाबाद ३१ धावांची खेळी करत संघाचा विजय सुकर केला. २४ चेंडूत ४२ धावांवर होप नाबाद राहिली.

## शालांत परीक्षेत भाषा विषयात सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या ठाण्यातील विद्यार्थ्यांचा ठाणे महानगरपालिकेकडून सन्मान

ठाणे : शालांत परीक्षा मार्च २०२४ मध्ये भाषा विषयात सर्वाधिक गुण प्राप्त केलेल्या ठाणे महापालिका क्षेत्रातील शाळांमधील विद्यार्थ्यांचा आज ठाणे महानगरपालिकेच्या वतीने सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त २ प्रशांत रोडे, उपायुक्त (माहिती व जनसंपर्क) उमेश बिरारी, उपायुक्त (शिक्षण) सचिन पवार यांच्यासह विद्यार्थी आणि त्यांचे पालक उपस्थित होते.

संस्कृत भाषेसाठी ऋजुला पाटील - गुण-१०० (ए. के.जोशी इंग्लीश मिडीयम स्कूल, ठाणे), इंग्रजी भाषेसाठी सृष्टी पाटील गुण - ९८ ( श्रीरंग विद्यालय), मराठी भाषेसाठी श्रियांश गावकर - गुण ९९ (सी.पी. गोयंका इंटरनॅशनल स्कूल), गुजराती भाषेसाठी राठोड कशिश अमितभाई - गुण ८३, (शेठ टी.जे. हायस्कूल, ठाणे) हिंदी भाषेसाठी साहिल बाबू शाह -गुण ९५ (वेद हिंदी हायस्कूल) उर्दु भाषेसाठी कु. अन्सारी शिफा अमिरउल हसन -गुण ९४ (शोएब उर्दु हायस्कूल) या विद्यार्थ्यांना अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी सर्व विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना ठाणे महानगरपालिकेच्यावतीने दोन हजार रुपयांचा धनादेश, सन्माचिन्ह व ग्रंथबुके देवून गौरविण्यात आले.

महाविकास आघाडीकडून शिवरायांच्या पुतळ्यास दुग्धाभिषेक

महाराज आम्हांला माफ करा, बॅनर्स झळकवले

# अनुभवहीन आपटेला काँट्रॅक्ट कुणी दिले : डॉ.जितेंद्र आव्हाड

**ठाणे : मालवण येथे उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराज यांचा आठ महिन्यांपूर्वी उभारलेला पुतळा कोसळला आहे. त्यामुळे शिवप्रेमी प्रचंड संतापले आहेत. मतांसाठी महाराष्ट्राच्या अस्मितेशी खेळण्याचा प्रकार राज्य आणि केंद्र सरकारने केल्याचा आरोप करीत डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांकडून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास दुग्धाभिषेक करण्यात आला. दरम्यान, ज्येष्ठ, श्रेष्ठ अनुभवी शिल्पकार आपल्याकडे आहेत. त्यांना विचारात न घेता या आपटेला कुठून शोधून आणलं? या आपटेने किती पुतळे बनवले होते. कुठलाही अनुभव नसताना आपटेला तुम्ही कॉन्ट्रॅक्ट का दिलं? असा सवाल डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी यावेळेस उपस्थित केला.**



मालवणच्या राजकोट किल्ल्यावर उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा ३५ फुटी पुर्णाकृती पुतळा कोसळला. ४ डिसेंबर २०२३ रोजी मालवणात पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते या पुतळ्याचं लोकार्पण करण्यात आले होते. मात्र, कोट्यवधींचा खर्च करुन बांधलेला हा पुतळा अवघ्या ८ महिन्यांत कोसळला. त्यामुळे शिवप्रेमींनी नाराजी व्यक्त केली.

या बुधवारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शरदचंद्र पवार, शिवसेना (उबाठा) आणि काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी ठाण्यातील मासुंदा तलाव येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यासमोर निदर्शने केली. या आंदोलनात मा. खा. राजन विचारे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष सुहास देसाई, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष विक्रांत चव्हाण, शिवसेना (उबाठा)चे जिल्हाध्यक्ष केदार दिघे, राष्ट्रवादीचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रकाश पाटील, महिलाध्यक्ष सुजाताताई घाग, काँग्रेस महिला अध्यक्षा स्मिता वैती, ठाणे काँग्रेसचे प्रवक्ते राहुल पिंगळे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले होते.

यावेळी कार्यकर्त्यांकडून केंद्र आणि राज्य सरकारच्या निषेधार्थ जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. महाराज आम्हाला माफ करा असे फलक घेऊन कार्यकर्त्यांकडून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास दुग्धाभिषेक करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी मोदी आणि महायुती सरकारवर प्रचंड टीका केली.

ते म्हणाले की, वादळवार्यामुळे कोकणातील नारळही पडत नाहीत. मात्र, आपटे नावाच्या इसमाने बनवलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा वादळामुळे कोसळतो, तुटतो, फुटतो आणि खाली पडतो. जे स्वतः महाराज अनेक वादळवाऱ्यांना सामोरे गेले. स्वराज्याची स्थापना केली आणि या रयतेला सुखी केले. महाराष्ट्र ओळखला






जातो तो शिवरायांमुळे ! आज या भ्रष्ट सरकारच्या भ्रष्ट काराभारामुळे ज्या आपटेने एकही पुतळा बनविला नव्हता त्या आपटेला काँट्रॅक्ट मिळतं. पुतळा बनवायला ३-३, ४-४ वर्ष लागतात. या आपटेने ३ महिन्यात किंवा १५ दिवसात बनवला. याच्यावर कुणाचं नियंत्रण नव्हतं. तो पुतळा बघितल्यावर ते शिवाजी महाराज वाटतच नव्हते. पण, या सरकारने कधीही काळजी घेतली नाही. आपले महाराज महाराजांसारखेच दिसले पाहिजे, हे प्रत्येक मराठी माणसाच्या हृदयातील वाक्य आहे. हा पुतळा तुटला हा शुभसंकेत नव्हे. महाराजांनी सांकेतिक भाषेत खुणावलंय. ही महाराजांच्या मनातली राज्य व्यवस्था नव्हे; सगळ्यात ५० टक्के वाटा घेतला जाणार असेल तर हेच होईल. कुठे ब्रीज तुटतोय, रस्ते खचतात, रस्त्याला खड्डा पडतोय. १००-२०० वर्षे पुतळे या जगात आहेत. तलावपाळीवरील पुतळ्यालाही खूप वर्षे झाली आहेत. तर कोल्हापुरातील शिवरायांचा पुतळाही शंभर वर्षापूर्वीचा आहे. स्टॅच्यू ऑफ लिबर्टी १८८६ साली बांधला गेला. तो बनला फ्रान्समध्ये आणि गेला अमेरिकेत ! अजूनही ज्येष्ठ, श्रेष्ठ शिल्पकार आपल्याकडे आहेत. त्यांना विचारात न घेता या आपटेला कुठून शोधून आणलं? महाराष्ट्राला माहिती द्या, या आपटेने किती पुतळे बनवले होते. कुठलाही अनुभव नसताना आपटेला तुम्ही कॉन्ट्रॅक्ट का दिलं? याची तपासणी का नाही करून घेतली. मी देखील स्वतः लोक वर्गणीतून पुतळा उभारला. गेटवे ऑफ इंडियाचा पुतळा बघा. बघा त्याची शान. तो जावून बघा. अजूनही अढळ आहे. महाराष्ट्रातला पहिला अश्वारुढ पुतळा नेहरूंनी बसवला. बघा त्या पुतळ्याची शान. महाराज म्हणजे महाराष्ट्र आहे. महाराजांचा पुतळा तुटला नाही तर मराठी माणसाच्या हृदयाला भेगा पडल्या आहेत. अजूनही शासनाकडूनही एकही माणूस बाहेर आला नाही. महाराजांची माफी मागितली नाही. महाराज चुकलो म्हणून. आपल्या संस्कृती, संस्कारात माफी मागितली. महाराष्ट्र उदार मनाने माफ करतो.

गणेशोत्सवाचा जिल्हाधिकारी यांनी संबधित यंत्रणेचा घेतला आढावा

## पर्यावरण पूरक उत्सव साजरा करण्याच्या संबधितांना सूचना

ठाणे : पर्यावरण पूरक गणेशोत्सव, कायदा व सुव्यवस्था आबाधित राखण्यासाठी समिती सभागृहामध्ये संबधित यंत्रणेचा जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी आढावा घेतला.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, पोलीस अधीक्षक डॉ.डी.एस.स्वामी, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने, सहायक पोलीस आयुक्त मंदार जावळे, योगेश गावडे, वाहतूक सहायक पोलीस आयुक्त विजयसिंह भोसले, ठाणे महानगरपालिका उपायुक्त जी. जी.गोदेपूरे, नवी मुंबई महानगरपालिका उपायुक्त डॉ.कैलास गायकवाड, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका सहायक आयुक्त सोनम देशमुख, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे तसेच संबधित विविध विभागाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

सर्व महानगरपालिका यांनी कृत्रिम तलावांची संख्या वाढवा,आपल्या कार्यक्षेत्रातील रस्ते व्यवस्थित करा.गणेश मंडळाना वेळेवर आवश्यक परवागी द्या.ध्वनी प्रदुषण होणार नाही यांची काळजी घ्या.वाहतूक कोंडी होणार नाही यांची दक्षता घ्या. पर्यावरण रक्षणासाठी पर्यावरण पूरव गणेशोत्सव साजरा करण्यासाठी जनतेला प्रोत्साहित करा.अशा सुचना जिल्हाधिकारी शिनगारे यांनी संबधिताना दिल्या. हा उत्सव परंपरे नुसार साजरा होणे गरजेचे आहे.या सणाचे पावित्र्य जपले पाहीजे.कोण चुकीचे वागत असेल तर त्याच्यावर कारवाई करा.गणपती विसर्जनासाठी पुरेसा बंदोबस्त ठेवा.तसेच तिथे लाईटची व्यवस्था करा.गणेश उत्सव हा पर्यावरण पुरक असला पाहीजे. केंद्र शासन व राज्य शासनाचे दिलेल्या सुचनाचे काटेकोर पालन करा.गणपती विसर्जन करताना मुर्तीची विटंबना होणार नाही यांची काळजी घ्या.गणेश उत्सव मंडळाना परवागी देताना नियमाचे काटेकोरपणे पालन करा.गणेश उत्सव मंडळाना कोणतीही अडचण होणार नाही यांची काळजी घ्या.उत्सावामध्ये सामाजिक सलोखा राखला जाईल यांची काळजी घ्या, असे ही यावेळी शिनगारे यांनी सांगितले.

## माहिती अधिकार कार्यकर्त्याला केले नजरकैद

पोलिसांच्या चौकशीचे राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे आदेश

**भाईंदर : माहिती अधिकार कार्यकर्ते राजू गोयल यांना ५ दिवस नजरकैदेत ठेवणे तसेच त्यांच्यावर गुन्हा दाखल झालेल्या प्रकरणाची दखल राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने घेतली आहे. याप्रकरणी तत्कालीन पोलीस उपायुक्त अमित काळे आणि तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयसिंह बाग यांची चौकशी करून त्याचा अहवाल सादर करण्याचे आदेश पोलीस आयुक्तांना देण्यात आले आहेत.**

भाईंदरचे माजी आमदार नरेंद्र मेहता यांच्यावर लाचलुचपत प्रकरणात दाखल असलेल्या गुन्ह्यात त्यांना जामीन मिळू नये यासाठी माहिती अधिकार कार्यकर्ते राजू गोयल यांनी न्यायालयात हस्तक्षेप याचिका दाखल केली होती. याच काळात गोयल यांना २३ सप्टेंबर ते २७ सप्टेंबर २०२२ असे पाच दिवस पोलिसांनी नजरकैद केले होते. त्यांच्या घराबाहेर पोलिस फौजफाटा तैनात करून ही पाळत ठेववण्यात आली होती.

दरम्यान, एका बदनामी प्रकरणात गोयल यांच्याविरोधात २४ सप्टेंबरला गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली होती आणि दोन दिवसांची पोलीस कोठडीही सुनावली होती. परिमंडळ १ चे तत्कालीन पोलीस उपायुक्त अमित काळे आणि नवघर पोलीस ठाण्याचे तत्कालीन पोलीस निरीक्षक विजयसिंह बागल यांनी बेकायदेशीर नजरकैदेत ठेवून खोट्या गुन्हा दाखल केल्याप्रकरणी गोयल यांनी राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडे दाद मागितली होती. याप्रकरणी तत्कालीन पोलीस उपायुक्त अमित काळे, आणि तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयसिंग बागल यांची चौकशी करून तात्काळ अहवाल सादर करण्याचे निर्देश आयोगाने पोलीस आयुक्तांना दिले आहे.

भाईंदरमधील शिवरायांचा पुतळा उद्घाटनाच्या प्रतीक्षेत!

## मुख्यमंत्र्यांना वेळच मिळेना

भाईंदर : मिरा भाईंदर महानगरपालिकेने उभारलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा गेल्या आठ महिन्यांपासून उद्घाटनाच्या प्रतीक्षेत आहे. २६ जानेवारी गेला आणि १५ ऑगस्टची तारीख उलटूनही या पुतळ्याचे अनावरण झालेले नाही. या पुतळ्याच्या उद्घाटनासाठी मुख्यमंत्र्यांची वेळ मिळत नसल्यामुळे महाराजांचा पुतळा झाकून ठेवण्याची नामुष्की पालिकेवर ओढवली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने मुंबई-अहमदाबाद मार्गांवरून किल्याजवळ जाणाऱ्या मुख्य चौकावर ३० फूट उंच ब्राँझ धातूचा छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारला आहे. मे. गारनेट इंटिरिअर या कंपनीने २०२१ मध्ये या पुतळ्याचे काम सूरु केले होते. पुतळा उभारण्यासाठी २ कोटी ९५ लाखाचा खर्च निर्धारित करण्यात आला आहे. त्यानुसार चौथरा उभा राहिल्यानंतर पुतळा उभारण्यात आला. मागील आठ महिन्यापासून हे काम पूर्ण होऊनही पुतळ्याचे अनावरण न झाल्यामुळे आता पुतळ्यावर लाल कपडा टाकून झाकण्यात आला आहे. पुतळा दुर्घटनेनंतर भाईंदरच्या या पुतळ्याचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

**मुख्यमंत्र्यांच्या वेळे अभावी अनावरण लांबणीवर?**

महापालिकेकडून या पुतळ्याच्या उद्घाटनाचा कार्यक्रम सातत्याने लांबणीवर टाकला जात आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार या पुतळ्याचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्याचा स्थानिक लोकप्रतिनिधीचा आग्रह आहे. मात्र मुख्यमंत्र्यांची वेळ मिळत नसल्यामुळे उद्घाटनाची निश्चित तारीख ठरू शकलेली नाही. परिणामी नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या उद्घाटनाचा दिवस अजूनही ठरवण्यात आलेला नाही.तसेच त्या ठिकाणी शिल्लक राहिलेले काम सुरु आहे.

– यतीन जाधव,
उप-अभियंता ( मिरा भाईंदर महानगरपालिका )

पिता पुत्राचे रेल्वे रूळावरील आत्महत्येचे गूढ उकलले

## मुलाचे प्रेमसंबंध उघड

वसई : भाईंदर रेल्वे स्थानकात धावत्या ट्रेनखाली झोपून आत्महत्या करणार्या वसईतील मेहता पिता पुत्रांच्या या आत्महत्येचे गूढ अखेर उकलले आहे. जय मेहता याने अन्य धर्मीय मुलीशी लग्न केले होते. ते प्रकरण उघडकीस झाल्याने समाजात बदनामी होईल या भीतीपोटी दोघांनी आत्महत्या केल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. जयचा मोबाईल फोन, कार्यालयात सापडलेली डायरी तसेच त्याची पहिली पत्नी आणि दुसर्या पत्नीच्या जबानीतून या प्रकरणाचा खुलासा झाला आहे.

हरिष मेहता (६०) हे मुलगा जय मेहता (३०) याच्यासह वसईच्या वसंत नगरी येथील रश्मी दिव्य हाऊस संकुलात राहत होते. जयचा काही महिन्यांपूर्वी एका दाक्षिणात्य मुलीशी प्रेमविवाह झाला होता. सोमवार ७ जुलै रोजी मेहता पिता-पुत्र भाईंदर रेल्वे स्थानकात धावत्या ट्रेनखाली आत्महत्या केली होती. दोघे स्थानकात उतरून चालत जाताना आणि अगदी सहज ट्रेनखाली झोपल्याचे सीसीटीव्ही मध्ये दिसत असल्याची चित्रफित सर्वत्र व्हायरल झाली होती. त्यांनी आत्महत्या का केली याचे गूढ होते. चौकशीनंतर या प्रकरणात धक्कादायक खुलासा झाला आहे. जय मेहता याचे एका मुस्लिम तरुणीशी मागील १० वर्षांपासून प्रेमसंबंध होते. त्या दोघांनी प्रतित्रापत्राद्वारे लग्नही केले होते. परंतु आपला समाज मुस्लिम तरुणीला स्वीकारणार नाही म्हणून त्याने तिला अंधारात ठेवून दाक्षिणात्य मुलीशी प्रेमविवाह केला होता.जयच्या पहिल्या पत्नीला ही बाब समजल्यानंतर तिने याबाबत जाब विचारला आणि पत्नीला सोड असा दबाव टाकायला सुरुवात केली.

नमुंमपा क्षेत्रात वृक्ष तोडणे अथवा स्थलांतरित करणेच्या परवानगीकरिता

## वृक्ष संगोपन तज्ज्ञ व्यक्तींची नेमणूक

नवी मुंबई : महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्ष संवर्धन आणि संवर्धन अधिनियम १९७५ (The Maharashtra (Urban Area) Protection and Preservation of tree Act 1975) अन्वये महानगरपालिका क्षेत्रातील वृक्षांचे संवर्धन, संरक्षण व जतन करणे, कर्तव्य ही वृक्ष प्राधिकरणाची मुख्य जबाबदारी आहे.

याबाबत पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन परिपत्रक, क्र. वृक्षक २०२१/प्र.क्र.२६/तां.क्र.४, दिनांक २४ जून २०२१ अन्वये स्थानिक वृक्ष प्राधिकरणाच्या कर्तव्यांमध्ये या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींचा सल्ला व मार्गदर्शन घेण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

त्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी, सार्वजनिक ठिकाणावरील वृक्ष तोडणे



अथवा स्थलांतरित करणेकरिता वृक्षसंगोपन तज्ज्ञ, बागकामतज्ज्ञ या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींची नेमणूक करणेत आलेली आहे. यामुळे महापालिका क्षेत्रातील कोणतेही वृक्ष विनाकारण तोडले जाणार नाहीत.

या अनुषंगाने विकास कामामध्ये येणाऱ्या किंवा धोकादायक वाटणाऱ्या प्रत्येक झाडाची प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करण्यात येणार आहे. त्यामुळे वृक्ष आहे त्याच जागी ठेवून वाचविणे शक्य असल्यास त्यादृष्टीने प्रयत्न करण्यात येतील. तसेच सदर वृक्ष बाधित होणार असल्यास त्या वृक्षाचे इतर ठिकाणी स्थलांतर करताना शास्त्रीय पध्दतीने पुनर्रोपण करण्यात येईल.

त्याचप्रमाणे काही वृक्षावर कीड किंवा रोगाचा प्रादुर्भाव आढळल्यास आवश्यकतेनुसार उपाययोजना करण्यात येणार आहे. या वृक्षांची तपासणी करताना रजिस्ट्रोग्राफ सारख्या अत्याधुनिक उपकरणांचाही वापर करण्यात येणार आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेने याकामी नेमणूक केलेल्या वृक्षसंगोपन तज्ज्ञ, बागकामतज्ज्ञ क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींमध्ये असीम हरवंश, नकुल सवानी, श्रीमती गौरवी ठसाळे, ऋतिक मुरुडकर, वैभव राजे यांचा समावेश आहे.

यामुळे खाजगी क्षेत्रातील वृक्ष तोडण्याची मागणी करणाऱ्या नागरिकांनासुध्दा या वृक्षसंगोपन तज्ज्ञ, बागकामतज्ज्ञ क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींचा सल्ला घेता येणार आहे. महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागाने केलेल्या या तज्ज्ञांच्या नेमणूका नवी मुंबईतील वृक्षसंपदा रक्षण व जतन करण्यासाठी महत्वाच्या आहेत.

## भिवंडीत महावाचन उत्सव साजरा



**भिवंडी : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा-२ विविध शाळांमध्ये राबविण्यात येत आहे. सदर योजनेअंतर्गत महावाचन उत्सव भिवंडी येथील ज. ए. इ.प.रा.विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय शाळेत उत्साहात साजरा करण्यात आला.**

सदर कार्यक्रमाचे उद्घाटन शाळेचे माजी विद्यार्थी व वाचन मंदिर भिवंडीचे कार्यवाह किशोर दिवाकर नागावेकर यांच्या हस्ते करण्यात आले. नागावेकर यांनी या प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद साधला. 'फक्त पुस्तकेच नव्हे तर इमारती, माणसे,गर्दी सर्वांचेच वाचन म्हणजे निरीक्षण व अवलोकन करता येते. धार्मिक पुस्तके व्रतवैकल्यांमधून आपले विज्ञानही समृद्ध होते', असे प्रतिपादन त्यांनी केले. तसेच वाचनालयाचे सदस्य होऊन सतत वाचन करा असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. शालेय समिती अध्यक्ष सुधीर पिंपळे सर यांनी आपल्या मनोगतात वाचन हा आपल्या जीवनाचा आधार असल्याचे व वाचाल तर वाचाल असे मनोगत मांडले. माध्यमिक विभागाचे उपमुख्याध्यापक विकास पाटील सर यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन व प्रास्ताविक मांडण्याची जबाबदारी पार पाडली. तसेच आपल्या मनोगतात त्यांनी सावित्रीबाई फुले व इतर शिक्षण महर्षी यांचे स्त्री शिक्षणातील महत्त्व अधोरेखित केले. सदर कार्यक्रमास शालेय समिती अध्यक्ष सुधीर पिंपळे, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका पौर्णिमा माळी, उपमुख्याध्यापक विकास पाटील, पर्यवेक्षक गुरुनाथ जोशी व आर. बी. होडगर सर, पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका अनिता सुतार मॅडम व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका शुभांगी पाटील मॅडम उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर व उत्स्फूर्तपणे उपक्रमास प्रतिसाद दिला यासाठी उपमुख्याध्यापक विकास पाटील यांनी पालकांचे व विद्यार्थ्यांचे मनस्वी आभार मानले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यामध्ये समिती प्रमुख देवेंद्र पाटील, राहुल गागडे, सदाशिव गारळे, दत्तू गवारी, संतोष भोईर, योगेश वल्लाल, पवन शास्त्री, साईनाथ म्हस्कर, सविता कांबळे, गीता कोठे व सर्व शिक्षकांचे महत्त्वपूर्ण योगदान लाभले.

## ८६ अधिकारी, कर्मचारी यांना पदोन्नती व २१२ जणांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्याचा कर्मचारीहिताय निर्णय

नवी मुंबई : मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले नमुंमपा अधिकारी / कर्मचारी यांची पदोन्नती तसेच त्यांना आश्वासित प्रगती योजना लागू करणे हे विषय महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार प्रशासन विभागामार्फत विशेष लक्ष देत मार्गी लावण्यात येत आहेत.

या अनुषंगाने अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली, प्रशासन विभागाचे उपआयुक्त शरद पवार व पदोन्नती निवड समितीने १२ संवर्गातील ८५ अधिकारी, कर्मचारी यांना पदोन्नती व १९ संवर्गातील २१२ अधिकारी, कर्मचारी यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्याचे निश्चित केले आहे. त्यानुसार लवकरच या अधिकारी, कर्मचारी यांना तशा प्रकारचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत. विशेषत्वाने यामध्ये तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचा प्राधान्याने विचार करण्यात आलेला आहे.

पदोन्नतीमध्ये - अधिक्षक / वसुली अधिकारी संवर्गात २०, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) संवर्गात २, उपअभियंता (स्थापत्य) संवर्गात ११, सहा. अग्निशमन अधिकारी संवर्गात ४, अग्निशमन प्रणेता संवर्गात ६, ड्रायव्हर ऑपरेटर संवर्गात ३०, लेखाधिकारी / लेखा परीक्षा अधिकारी संवर्गात २, उद्यान अधिक्षक संवर्गात २, सहा. लेखा अधिकारी / सहा. लेखा परीक्षा अधिकारी संवर्गात १, लेखा लिपिक संवर्गात २, उपअभियंता (विद्युत) संवर्गात ४, उप अभियंता (यांत्रिकी) संवर्गात २



अशाप्रकारे एकूण ८६ अधिकारी / कर्मचारी यांना पदोन्नती देण्यात येणार आहे.

त्याचप्रमाणे ३ लाभांची सुधारित सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजना १९ संवर्गातील २१२ अधिकारी, कर्मचारी यांना लागू करण्यात आली असून त्यामध्ये १ अधिक्षक, १ दूरध्वनी चालक, १ सफाई कामगार कम क्लिनर, ८ सफाई कामगार, १३ शिपाई, २ मदतनीस / सहा.प्लंबर, १२ उपअभियंता (स्थापत्य), २५ कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), ३ उपलेखापाल / लेखा परीक्षक, २ शल्यचिकित्सक, ३ सार्वजनिक आरोग्य परिचारिका, ७ सिस्टर इन्चार्ज / नाईट सुपरवाईझर, १३ आरोग्य सहाय्यक (महिला), २१ आरोग्य सहाय्यक, १० स्टाफ नर्स, ७९ ऑक्झिलरी नर्स मिडवाईफ, १ दंत शल्याचिकित्सक, ९ माळी / बहुउद्देशीय सेवक, १ कक्षसेवक अशाप्रकारे एकूण २१२ अधिकारी, कर्मचारी यांचा समावेश आहे.

नवी मुंबई महानगरपालिका अधिकारी / कर्मचारीवृंदाला सेवांतर्गत लाभ मिळवून देण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासन विभाग गतीशील काम करीत असून यामुळे नमुंमपा अधिकारी, कर्मचारीवृंदामार्फत समाधान व्यक्त करण्यात येत आहे. याचा सकारात्मक परिणाम दैनंदिन कामकाजावर होणार असून नागरिकांना उत्तम सेवा सुविधा पूर्ततेसाठी ही बाब उपयोगी ठरणार आहे.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१